☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट/280/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 17/07/2025

# 1)चोरी :-

**1)वजिराबाद :-** दिनांक 13.07.2025 रोजी 19.00 वा.ते 22.00 वा.चे दरम्यान, **लातुर ते हिंगोली गेट प्रवासा दरम्यान नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे 1.गुरूदेवसिंघ लालसिंघ जर्गर, वय 44 वर्षे, व्यवसाय चालक रा. न्यु रामनगर, रायपूर राज्य छत्तीसगड 2. अस्लम खान, व्यवसाय चालक रा.बराजमोर गाव, राज्य छत्तीसगड 3. विनोद कुमार कन्हैया लाल राजपूत, वय 40 वर्षे, रा.गंज चौक राज्य छत्तीसगड यांनी यातील फिर्यादी हे लातूर ते हिंगोली गेट नांदेड असा जहागीरदार ट्रॅव्हल्सने प्रवास करताना प्रवासा दरम्यान फिर्यादीनी त्यांची बॅग ट्रॅव्हल्सचे डिक्की मध्ये ठेवली सदर बॅगमध्ये सोन्याचे दागिने 166.61 ग्रॅम वजनाचे किंमती 9,37,340/-रू व नगदी 40,000/-रू असा एकुण 9,77,340/-रू मुद्देमाल होता तो मुद्देमाल नमुद आरोपीतानी चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अर्सलानखान अर्शदखान पठाण, वय 29 वर्षे, व्यवसाय कॉन्ट्रॅक्टर, रा. समीरा बाग, वाघीरोड नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 306/2025 कलम 303(2)भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/लोंढे मो. नं.** 9822673522 हे करीत आहेत.**सदर गुन्हयातील दोन आरोपीवर अटकेची कारवाई करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.**

**2)हदगाव :-** दिनांक 15.07.2025 रोजी 14.00 वा.चे सुमारास, **भाजी मंडई हदगाव ता.हदगाव जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे एस.बी.आय.बँकतुन शेतीच्या कामासाठी नगदी 1,00,000/-रू काढून पिशवीत ठेवून पिशवी मोटार सायकलला अडकवून भाजी खरेदी करत असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने सदर पिशवी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी देवानंद किशनराव निमडगे, वय 35 वर्षे, रा.पळसा ता.हदगाव जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 233/2025 कलम 303(2)भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2938 जुडे मो. नं.** 7249815669 हे करीत आहेत.

# 2)प्राणी संरक्षण कायदा :-

**मनाठा :-** दिनांक 16.07.2025 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **हदगाव ते वारंगा जाणारे रोडवर मौ.मनाठा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.शेख नसिरोद्दीन शेख नजीरोद्दीन, वय 43 वर्षे, व्यवसाय चालक रा. मदिना नगर अर्धापूर हा विना परवाना बेकायदेशीररित्या 07 म्हैस जातीचे जनावर एकुण किंमत 70,000/-रू यांना निर्दयीपणे बांधून आपले ताब्यातील पिकअप क्रमांक एमएच-26/सीएच-0512 किंमत 5,00,000/-रू चे मध्ये वाहतूक करीत असताना मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/778 अतुल अशोकराव नागरगोजे, ने. पोस्टे मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 141/2025 कलम 11(अ),(ड),(ई),(ह) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम मोवाका 139,130,177 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2231 दाढे** मो.क्रं. 7774050311 हे करीत आहेत.

# 3)जुगार :-

**अर्धापूर :-** दिनांक 15.07.2025 रोजी 20.10 वा. चे सुमारास, **मौ. शेलगाव शिवारात ता.अर्धापूर जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. सुरेश तातेराव राजेगोरे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती व इतर सात हे विना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 5000/-रु व पाच मोबाईल किंमती 66,200/-रु व जुगाराचे साहित्यासह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/615 विजय रामराव कदम, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 409/2025 कलम 12(अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/548 काळे, मो.क्रं. 9049565677** हे करीत आहेत.

# 4)प्रोव्हिबिशन :-

**हदगाव :-** दिनांक 16.07.2025 रोजी 19.55 वा. सुमारास, **आठवडी बाजार कॉर्नर हदगाव जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. संदिप उत्तम राठोड, वय 30 वर्षे, रा. डोंगरगाव तांडा 2. श्रीनिवास सुर्यकांत सोळंके, वय 32 वर्षे, रा. बाजार गल्ली हदगाव हे विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमत 13,580/-रू व एक मोटार सायकल फॅशन प्रो किंमत 30,000/ -रू असा एकुण किंमती 43,580/-रूपयाचे मुद्देमाला सह मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/सभांजी विठ्ठलराव हणवंते, नेम. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग भोकर,** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 234/2025 कलम 65(ई), म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2938 जुडे,** मो.नं. हे करीत आहेत

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड